# वसई-विरार शहर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय विरार

## मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ०६ सभा सुचना क्र. ०१ सभा दिनांक २०/०६/२०१९

**विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दीतील मालमत्ता धारकांनी परिस्थीतीकीय दृष्टया लाभदायक योजनेंची अंमलबजावणी केल्याबद्दल व करण्याकरीता मालमत्ता करातून सूट किंवा परतावा देणबाबत.**

प्रस्तावाचा मजकुर :- वसई-विरार शहर महानगरपालिकेची स्थापना दि. ३ जुलै २००९ रोजी झालेली असून त्यात ४ नगरपालिका व ५३ ग्रामपंचायतीचा समावेश करण्यात आला. अल्पावधीतच वसई विरार शहर महानगरपालिकेने अनेक बाबींमध्ये उत्कृष्ट कामगिरी करुन महाराष्ट्रातील इतर महापालिकेच्या तुलनेत शासन दरबारी चांगले नाव कमाविलेले आहे हा दृष्टीकोन डोळयासमोर ठेवून शहरातील नागरिकांना पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या दृष्टीने प्रवृत्त करणे व निर्सगाचे ऋण फेडण्याचा सदहेतू डोळयासमोर ठेवून काही बाबींवर उपायोजना करणे आवश्यक आहे.

१) पावसाचे पाणी साठविणे:

महाराष्ट्र राज्यातील अनेक जिल्हयात पाऊस कमी पडल्यामुळे नव्हे तर त्यापेक्षा पावसाचे पाणी न साठविल्यामुळे दुष्काळाचा व उपासमारीचा सामना करावा लागत आहे. यासाठी राज्य शासन वेगवेगळया योजना राज्यभरात राबवत आहेत. त्यात महाराष्ट्र सुजल व निर्मळ अभियान, नागरी दलीत वस्ती पाणीपुरवठा योजना, सुवर्णमहोत्सवी नागरी दलीत वस्ती पाणीपुरवठा योजना, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल, पेयजल मंत्री कार्यक्रम, जलयुक्त शिवार, पाणी अडवा-पाणी जिरवा, शेततळे इत्यादीचा समावेश होतो. पावसाचे पाणी साठविल्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी वाढते. कालांतराने या संचीत केलेल्या पाण्याचा उपयोग आपणांस करता येईल व दुष्काळाचा सामना करावा लागणार नाही. शासनाने नविन इमारतींना वास्तव्याचा दाखला देण्यापूर्वी रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टम ही बंधनकारक केलेली आहे. परंतू जुन्या इमारतींना ही अट नाही. जुन्या इमारती हया नविन इमारतींच्या कितीतरी पटीने जास्त आहेत. त्यामुळे रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टम हा शासनाचा उपक्रम प्रभावीपणे राबविला जात नाही असे दिसुन येते. वास्तविकता वसई-विरार शहर महानगरपालिकेतील भौगोलिक परिस्थितीचा विचार केला असता शहराची जमिनीखालील जागा ही समुद्र लगत असल्याने खारट पाण्याने ग्रासलेली आहे. क्षारयुक्त पाणी जमिनीखाली असल्याने त्याचे बरेच तोटे आहेत.

१. क्षारयुक्त पाणी पिण्यास उपयुक्त नाही.
२. क्षारयुक्त पाण्यामुळे बांधकाम लवकर कमकुवत होते.
३. भुंकप झाल्यास क्षारयुक्त पाण्याने कमकुवत झालेल्या बिल्डिंग लवकर कोसळतात व जिवित हानी होऊ शकते.

या बाबी टाळण्यासाठी आपल्या शहरातील भूगर्भातील पावसाच्या पाण्याची पातळी वाढविणे फार आवश्यक आहे. पावसाचे पाणी वाढविण्याच्या दृष्टीने शहरातील नागरीकांना पावसाचे पाणी साठविण्यासाठी प्रभाविपणे प्रोस्ताहित करणे आवश्यक आहे. शहरातील नागरीकांना प्रोस्ताहित करण्यासाठी जे नागरीक रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टम राबवून पावसाच्या पाण्याची बचत करतील व त्याचा वापर करतील त्याना मालमत्ता करात २% सवलत मिळेल. तसेच प्रकल्प खर्चाच्या २०% किंवा अधिकतम रु. १ लक्ष इतके अनुदान अनुज्ञेय स्वरुपात मदत देणेबाबत सन २०१७-१८ व २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात तरतूद केलेली आहे. त्याअनुषंगाने बीलाच्या पृष्ठ भागावर असे छापण्यातही आलेले आहे.

त्यामुळे महापालिकेच्या मा. सर्व साधारण सभेत जे नागरीक रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टम राबवतील (नवीन इमारती वगळून) २०१७-२०१८, २०१८-२०१९ या वर्षात राबवलेली असेल अशा मालमत्ता धारकांना मालमत्ता करात २% सवलत मिळेल. तसेच प्रकल्प खर्चाच्या २०% किंवा अधिकतम रु. १ लक्ष इतके अनुदान अनुज्ञेय देणेबाबतचा प्रस्ताव मंजुर करणे आवश्यक आहे.

२) सौरऊर्जा प्रकल्प:

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी नैसर्गिक स्त्रोतांचा बचत करणे हे प्रत्येक नागरीकांचे कर्तव्य आहे. या कर्तव्य भावनेतुनच शासनाकडुन मिळणारी विज कमी वापर करुन सौरऊर्जा प्रकल्पातुन तयार होणारी विज संचित करुन त्याचा वापर

कल्यास फार मोठ्या प्रमाणात विजेची बचत होऊ शकते. आपल्या महापालिकेने हा उद्देश विचार घेऊन शहरातील नागरीकांना सौरऊर्जा प्रकल्प राबविण्याच्या उद्देशाने प्रोत्साहित करणे आवश्यक आहे.

सन २०१७-२०१८ व २०१८-२०१९ च्या अंदाजपत्रकात जे मालमत्ता धारक आपल्या इमारतींवर किंवा घरांवर सौरऊर्जा प्रकल्प राबविले आहेत व यापुढे राबवतील अशा मालमत्ता धारकांना निसर्गाचे ऋण फेडत राहतील तोपर्यंत म्हणजेच सौरऊर्जा प्रकल्प राबवत राहतील तोपर्यंत मालमत्ता करात प्रतिवर्षी २% सुट व त्यांनी राबविलेला प्रकल्पाच्या २०% प्रकल्प रक्कम किंवा जास्तीत जास्त १ लक्ष पर्यंत अनुदान देण्याची तरतूद आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १४० व अन्वये पारिस्थितीतकिय दृष्टया लाभदायक योजनेची अमंलबजावणी करण्या करीता मालमत्ता करातून सुट किंवा परतावा महापालिकेला सर्व साधारण किंवा विशेष आदेशाव्दारे निर्धारीत करील अशा दराने देण्याची तरतुद आहे. या कलमाच्या प्रयोजनार्थ "पारिस्थितीकीय दृष्टया लाभदायक योजना" या शब्द प्रयोगात पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था, कृमी मिश्रा खत, सौरऊर्जेचा वापर इत्यादी गोष्टीचा समावेश होतो.

तरी उपरोक्त सर्व बाबीचा विचार होऊन महानगरपालिकेच्या मा.सर्वसाधारण सभेपुढे खालीलप्रमाणे निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव सविनय सादर.

१) सन २०१७-१८, २०१८-१९ या वित्तीय वर्षात ज्या मालमत्ता धारकांनी आपल्या इमारती किंवा घरावर पावसाचे पाणी साठविण्याची (रेन वॉटर हार्वेस्टींग) व्यवस्था करतील (नवीन इमारती वगळून म्हणजेच ज्या इमारतींना महानगरपालिकेने इमारत रहिवासाचा दाखला देतांना ( रेन वॉटर हार्वेस्टींग) बंधनकारक केलेले आहे अशा इमारती व घरे वगळून) नगरविकास विभागाच्या रेन वॉटर हार्वेस्टींग राबविण्याचा आर्देश आचारसहिता नियमानुसार प्रकल्प राबवितील अशा मालमत्ता धारकांना,

२) ज्या मालमत्ता धारकांनी सन २०१७-१८ , २०१८-१९ व या पुढे इमारती व घरावर सौर ऊर्जा प्रकल्प विदयुत विभागाच्या आर्देश आचारसंहितेनुसार प्रकल्प राबविलेला असेल किंवा राबविला तर अशा मालमत्ता धारकांना,

वरील प्रकल्प राबविल्या बद्दल व राबवतील/राबवीत राहतील तोपर्यंत प्रत्येक प्रकल्पासाठी मालमत्ता करातून २% सूट व एकवेळ प्रकल्प रक्कमेच्या २०% किंवा १ लक्ष पर्यंत किंवा त्यापेक्षा कमी असेल ती रक्कम अनुदान म्हणुन परतावा करणेबाबतचा प्रस्तावावर मा. सर्व साधारण सभेत चर्चा करण्यात आली प्रस्तावात सांडपाण्याचे पुनश्चकरण आणि पुर्नवापर या प्रकल्पाचा समावेश नसल्यामूळे सदर प्रकल्पाचाही समावेश करुन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

**निर्णय :-** ज्या मालमत्ता धारकांनी सन २०१७-१८,२०१८-१९ या वित्तीय वर्षात रेन वॉटर हार्वेस्टींग (नवीन इमारती वगळून), सौर ऊर्जा व सांडपाण्याचे पुनश्चकरण आणि पुर्नवापर हे प्रकल्प महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या निकष (Norms) व मानके (Standard) नुसार राबविलेले असतील किंवा भविष्यात राबवतील अशा मालमत्ता धारकांना प्रकल्प राबविलेबद्दल व प्रकल्प जोपर्यंत राबवित राहतील तोपर्यंत प्रत्येक प्रकल्पासाठी प्रति वर्षी मालमत्ता करातून २% सूट (इतर कर वगळून सामान्य कर) व प्रकल्प खर्चाच्या एकवेळ २०% रक्कम परंतू जास्तीत-जास्त १ लक्ष मर्यादेपर्यंत प्रति प्रकल्प अनुदान अदा करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास हि सभा प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देत आहे.

सुचकाचे नांव - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)

अनुमोदकाचे नाव - माया चौधरी

अनुकूल संख्या --------------- प्रतिकुल संख्या------------------ तटस्थ संख्या-----------

ठराव/सर्वानुमते/बहुताने/मंजूर/नामंजूर

(रुपेश जाधव)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

सत्य प्रत
१३/२/१९

महानगरपालिका सचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका